20 AUG 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची संधी!

## नवीन शैक्षणिक धोरण; वर्ष २०२२-२३ नियम लागू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना दोन पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण एकाचवेळी घेण्याची परवानगी नव्हती. पूर्णवेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेता येत होते. आता नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची संधी शिवाजी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे.

नवीन शैक्षणिक धोरण विविध वैशिष्ट्यांमुळे महत्त्वाचे मानले जात आहे. हे धोरण विद्यार्थ्यांना केंद्र मानून त्यांची आवड, क्षमता व कौशल्यांना पुरेपूर वाव देण्यासाठी विविध सुविधांचा विचार करीत आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक सुधारणा, नियमात शिथिलता व नवीन धोरणे राबवीत आहे. याचाच एक भाग म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाने नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाचवेळी अनेक कौशल्ये संपादन करण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांना एकाचवेळी पदविका आणि दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार आहे. हा नियम २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी लागू असणार आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांना दोन पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण एकाचवेळी घेण्याची परवानगी नव्हती. पूर्णवेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेता येत होते. मात्र, आता एकाचवेळी दोन पूर्णवेळ अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. त्यामुळे एकाचवेळी दोन पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा एक पदवी आणि पदव्युत्तर पदवी, पदविका आणि पदवी असे वेगवेगळे पर्याय उपलब्ध होणार आहेत.

### पीएच.डी., एम.फिल.साठी हा नियम नाही

पदव्युत्तर शिक्षण घेताना विद्यार्थ्याला दुसऱ्या विषयाच्या पदवी अभ्यासक्रमाचीही निवड करता येणार आहे. 'यूजीसी'कडून विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यावर असणार नाही. हा निर्णय डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लागू आहे. हा निर्णय पीएच.डी., एम.फिल. पदवीसाठी लागू असणार नाही.



तरूण भारत

# विद्यार्थ्यांना मिळवता येणार दोन पदवी

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) विद्यार्थी-विद्यार्थीनींमधील कौशल्य, क्षमता आणि बुद्धीमत्तेला चालना देण्यासाठी नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत विशेष पाऊल उचलले आहे. या धोरणातील समाविष्ट मार्गदर्शक तत्वांनुसार देशातील विद्यार्थ्यांना एकाच वेळी पदविका (डिप्लोमा) आणि दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता येणार आहे. चालू शैक्षणिक वर्षापासूनच विद्यार्थ्यांना आपल्या पदविका, दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येणार आहे. एकाचवेळी विविध अभ्याक्रमांना प्रवेश मिळण्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ तर होणार आहेच, शिवाय मिळणाऱ्या पदव्यांचा नोकरी मिळवण्यासाठी खूप उपयोग होणार आहे. या संदर्भात शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की नवे शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानूनच तयार केले आहे. शिवाय त्यांच्यातील आवडी, क्षमता व कौशल्यांना वाव देणे हाही धोरण तयार करण्यामागचे प्रमुख कारण आहे. आतापर्यंत देशातील विद्यार्थ्यांना दोन पूर्ण वेळ पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण एकाचवेळी घेण्यासाठी युजीसीची परवानगी नव्हती. पूर्णवेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेण्याची मुभा मात्र दिली होती. आता युजीसीने एक पाऊल पुढे टाकत तयार केलेल्या नव्या धोरणानुसार विद्यार्थ्यांना पदविका (डिप्लोमा) आणि दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता येणार आहे. यामुळे सध्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याला दुसऱ्या विषयांच्या पदवी अभ्यासक्रमांची ही निवड करता येणार आहे. शिवाय अभ्यासक्रम निवडण्याबाबत कोणतीही सक्ती विद्यार्थ्यांवर असणार नाही. युसीजीचा हा निर्णय केवळ आणि केवळ डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लागू आहे, असेही विद्यापीठाने निवेदनात नमूद केले आहे.

- **युजीसीचा निर्णय : एकाच वेळी पदविका, दोन पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार**

सकाळ

# एकाच वेळी शिका विविध अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. १९ : विद्यापीठ अनुदान आयोगाने नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी अनेक कौशल्य संपादन करण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठात एकाच वेळी पदविका, दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार आहे. हा नियम २०२२ - २३ शैक्षणिक वर्षांतील अभ्यासक्रमांसाठी लागू आहे.

विद्यार्थ्यांना दोन पूर्ण वेळ पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण एकाच वेळी घेण्याची परवानगी नव्हती. पूर्णवेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेता येत होते. आता एकाचवेळी दोन पूर्ण वेळ अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. त्यामुळे एकाचवेळी दोन पदविका / पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा एक पदवी आणि पदव्युत्तर पदवी, पदविका आणि पदवी असे वेगवेगळे पर्याय उपलब्ध होतील.

पदव्युत्तर शिक्षण घेताना विद्यार्थ्याला दुसऱ्या विषयाच्या पदवी अभ्यासक्रमाची ही निवड करता येईल. विद्यापीठ अनुदान आयोगानुसार विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यावर असणार नाही. हा निर्णय पीएच.डी.आणि एम.फिल.साठी लागू नाही.

Times of India

# SUK gets UGC nod for distance learning

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has approved Shivaji University Kolhapur's (SUK) proposal to start distance learning graduate and post-graduate courses.

The admission process for the courses started from Thursday. SUK got the approval for starting distance learning programmes like bachelor of arts (BA), bachelor of commerce (BCom), master of arts (MA-languages and social sciences), master of commerce and master of Business Administration (MBA). The degree certificate from distance learning is considered equivalent to the degree certificate received through regular classroom coaching.

The students have time till October 10 to fill the admission form, pay the fees for both semesters and submit the physical copies at the distance learning centre on the SUK campus.

For the MBA course, the students who have qualified for the MBA entrance exam but could not make it to the final merit list would be considered eligible to seek admission and preference will be given to them.

D K More, the director of the distance learning centre, said that the courses will be imparted through two subcentres and 81 centres located in three districts - Sangli, Satara and Kolhapur. The centres are located in remote parts of the university's jurisdiction. The students have to choose the centre which will also be their exam centre during the period of the academic course.

20 AUG 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आनंदाचे धाम

माणूस गाणे गातो, चित्र काढतो, शिल्प घडवतो, झाडे लावतो, पशू-पक्ष्यांची काळजी घेतो. अशा अनेक छंदांतून आनंद शोधतो. चौसष्ट कलांपैकी एखादी तरी कला त्याच्याकडे असतेच. कलेतून व्यक्त होण्यासाठी प्रतिभेची गरज असते. ती प्रत्येकाकडे असतेच असे नाही. काहींकडे कोणतीच कला नसते. मात्र, त्यांना चांगल्या कामाचे कौतुक करण्याची सवय असते. हा छंद व जीविका होय. म्हणजे आनंदाने जगण्यासाठी उपजीविका व जीविका या दोहोंची गरज असते.



डॉ. व्ही. एन. शिंदे



पृथ्वीवर जल, जंगल आणि जमीन या तिन्ही घटकांमध्ये असंख्य जीव राहतात. आजदेखील सर्वांची आपणास ओळख झालेली नाही. या जीवांना जेथे जेथे पोषक वातावरण मिळेल, तेथे तेथे ते जगत असतात. यामध्ये जीवाणू, विषाणू, वनस्पती, जलचर, उभयचर, पशू आणि पक्षी सर्व आहेत. या सर्वांमध्ये वेगळा आहे तो मनुष्य.

सुरुवातीला मानवदेखील अन्य प्राण्यांप्रमाणेच होता. हजारो वर्षांपूर्वी त्याने इतर प्राण्यांपासून वेगळी ओळख बनविण्यास सुरुवात केली. सुरुवातीला निसर्गात उपलब्ध असणारे अन्न-फळे, कंदमुळे खात असे. शिकार करून मांस खात असे. पुढे त्याने अन्नाची खात्रीने उपलब्धता व्हावी, यासाठी शेती करायला सुरुवात केली. शेतीने मानवाला स्थैर्य दिले. या स्थिरतेने मानवाला विचार करण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध करून दिला. त्याने आपले जीवन आणखी सुखकर बनविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

त्यासाठी त्याने विविध यंत्रे बनविली. भौतिक सुखाची साधने आणि उपकरणे बनविली. दळणवळणात क्रांती घडविली. वाहने बनविली. त्यासाठी आवश्यक ऊर्जा मिळविण्यासाठी इंधने शोधली. या सर्व प्रगतीचा निसर्गावर अनिष्ट परिणाम होत होता; पण यातून मानवाचा वेळ आणि श्रम वाचले. निवांतपणा मिळाला. यातून पुन्हा नवे शोध लावले. त्यातूनच आजचे युग अवतरले.

आजच्या युगातही मानवाची पोटाची चिंता मिटलेली नाही. पुरेसे अन्न न मिळाल्यास भूक मानवाला झोप मिळू देत नाही. ही भूक मिटविण्यासाठी मानवाला उपजीविकेचे साधन शोधावे लागते. उपजीविकेचे साधन उपलब्ध झाल्यास मानवाची मोठी चिंता मिटते. भुकेचा प्रश्न मिटलेला असेल, तर मानवाच्या जीवनामध्ये दुसरा भाग अवतरतो, तो म्हणजे आनंदाचा. पोटाची भूक भागलेली असेल तर मानव आनंदाचे धाम शोधावयास मोकळा असतो. हे 'आनंदाचे धाम' तो छंदात शोधतो.

माणूस गाणे म्हणतो, चित्र काढतो, शिल्प घडवतो, कविता लिहितो, झाडे लावतो, बागकाम करतो, पशू, पक्ष्यांची काळजी घेतो. अशा अनेक छंदांतून आनंद शोधतो. चौसष्ट कलांपैकी एखादी तरी कला माणसाकडे असतेच. कलेच्या माध्यमातून व्यक्त होण्यासाठी प्रतिभेची गरज असते. ती प्रत्येकाकडे असतेच, असे नाही. काही लोकांकडे कोणतीच कला नसते. मात्र, त्यांना एखाद्याने केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करण्याची सवय असते. हा छंद, जीविका होय. म्हणजेच माणसाला आनंदाने जगण्यासाठी उपजीविका आणि जीविका या दोहोंची गरज असते.

जीविका आनंदाचे धाम बनण्यासाठी पोट मात्र भरलेले असावे लागते. समजा खूप दिवसांपासून एक चित्रपट पाहावयाची एका माणसाला इच्छा आहे. तो एका चांगल्या घरामध्ये राहतो. तो चित्रपट दूरचित्रवाणीवर लागला आहे. मात्र, काही कारणांमुळे तो उपाशी आहे. असा चित्रपट सुरू झाला, तरी तो माणूस त्या चित्रपटाचा मनापासून आनंद घेऊ शकेल का? किंवा एकाकडे २०० रुपये आहेत. तो उपाशी आहे. समोरच्या चित्रपटगृहामध्ये खूप दिवसांपासून त्याला पाहावयाचा चित्रपट लागलेला आहे. अशा वेळी तो निश्चितच पोटाची भूक भागविण्यास पसंती देईल. म्हणजेच मानवाच्या जीवनात उपजीविकेला प्रथम प्राधान्य असते. मात्र, एकदा का पोट भरले की, तो आनंद शोधू लागतो.

उपजीविकेसाठी माणूस शेती करतो, उद्योग, व्यवसाय करतो, व्यापार करतो, त्यातून पैसे कमावतो. ज्यांच्याकडे यापैकी काहीच नाही, ते नोकरी करतात. मग ती सरकारी असो किंवा खासगी. नोकरी करणाऱ्याचा सरकारशी किंवा मालकाशी एक प्रकारचा करार झालेला असतो. नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याने ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी विहीत केलेले काम पूर्ण करावयाचे आणि त्याबद्दल शासन किंवा मालकाने ठरल्याप्रमाणे कर्मचाऱ्यास विहीत रक्कम द्यायची.

या कराराप्रमाणे कर्मचारी काम करत असतो. मात्र, प्रत्यक्षात एका संशोधनानुसार आणि सर्वमान्य तत्त्वानुसार कोणत्याही आस्थापनेमध्ये शंभर टक्के कर्मचारी ठरल्याप्रमाणे कार्यरत नसतात. वीस टक्के कर्मचारी पूर्ण क्षमतेने योगदान देत नाहीत. साठ टक्के कर्मचारी परिस्थितीनुरूप योगदान देतात. वीस टक्के कर्मचारी मात्र करारापेक्षा जास्त योगदान देतात. हे कर्मचारी संस्थेला खऱ्या अर्थाने मोठे बनवित असतात. संस्थेच्या लौकिकामध्ये भर घालत असतात. कारण ते नोकरीमध्ये आनंद शोधत असतात.

साठ टक्के कर्मचारी जे परिस्थितीनुरूप योगदान देत असतात, त्यांच्या दृष्टीने नोकरी करणे म्हणजे पाट्या टाकणे असते. ते वेळेचे बांधील असतात. 'ठरल्या वेळेत कार्यालयात उपस्थित असणे म्हणजे दिवसभरचे काम झाले', असे त्यांचे मत असते. पण नोकरीला 'पाट्या टाकणे' मानणाऱ्या व्यक्तींनी एक गोष्ट करायला हवी, या पाट्या 'भरलेल्या' टाकायला हव्यात. रिकाम्या पाट्या टाकण्यापेक्षा भरलेल्या पाट्या जर टाकल्या, तर निश्चितच त्यातून एक भराव तयार होईल. पावसाळ्यामध्ये त्या भरावामुळे पाणी अडेल. तेथे जलाशय तयार होईल. त्या जलाशयामुळे तेथे जीवसृष्टी अस्तित्वात येईल. नोकरी करणे म्हणजे पाट्या टाकणे मानणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जर आठ तास किंवा नियोजित वेळेत काम करायला सुरुवात केली, तर संस्थेच्या किंवा त्या कार्यालयाच्या लौकिकामध्ये, कार्यक्षमतेमध्ये मोठी वाढ होते. ती संस्था, कार्यालय किंवा कंपनी मोठी होत जाते.

जीविका आणि उपजीविका एकत्र आणणे खूप अडचणीचे ठरते. समजा, एखाद्याला चित्र काढण्यामध्ये आनंद मिळतो. निवांत वेळी त्याने काढलेली चित्रे अप्रतिम असतात. मात्र, कार्यालयात अत्यंत महत्त्वाच्या विषयावर बैठक सुरू असताना तो चित्र काढत बसला तर तो कार्यालयाचे मोठे नुकसान करतो. तसेच एखादा आधिकारी आपल्या कार्यालयात कडक शिस्तीचा म्हणून प्रसिद्ध असेल, तर त्याने ती शिस्त कार्यालयातच ठेवायला हवी. तीच शिस्त घरात आणणे अडचणीचे आणि घरातील वातावरण बिघडवणारे ठरते. म्हणून जीविका आणि उपजीविका या स्वतंत्र ठेवणे आवश्यक असते. यासाठी कर्मचाऱ्यांनी उपजीविकेमध्ये जीविका शोधायला हवी.

एखाद्या कर्मचाऱ्याला बागकामाची आवड आहे. त्याने आपल्या कार्यालयात कुंड्या ठेवायला लावल्या. त्या कुंड्यांकडे कार्यालयातील काम करताना फावल्या वेळेत थोडेसे लक्ष द्यायला सुरुवात केली, तर कार्यालयातील वातावरण निश्चितच बदलून जाईल. ज्याला चित्रे काढायला आवडते, त्याने आपल्याकडील चित्रांपैकी उत्तम चित्रांनी कार्यालयाच्या भिंती सजविल्या, तर त्या कार्यालयाचे सौंदर्य नक्कीच वाढेल. आपण काढलेली चित्रे नजरेसमोर असताना मनदेखील आनंदी राहील. सहकाऱ्यांमध्ये चर्चा करत असताना कार्यालयाच्या उत्कर्षाच्या चर्चा घडायला हव्यात. आपण आपल्या घराची जशी काळजी घेत असतो, तशीच कार्यालयाचीही काळजी घ्यायला हवी.

(लेखक, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव आहेत.)

## निश्चितच लौकिक वाढेल

१ अनेक कार्यालयांत गट-तट असतात. हे टाळायला हवे. इलेनॉर रुझवेल्ट यांचे वाक्य प्रसिद्ध आहे. त्या म्हणतात, 'सामान्य मनाची माणसे इतरांची चर्चा करतात, मध्यम मनाची माणसे ही कार्यक्रमांची चर्चा करतात, तर मोठ्या मनाची माणसे भविष्यातील कार्यक्रमांसह उपक्रमांची चर्चा करतात.'

२ विविध कर्मचाऱ्यांमध्ये कशा स्वरूपाच्या आणि काय चर्चा चालतात, हे पाहिले की त्या कार्यालयाचे भविष्य समजते. आपण कशा स्वरूपाच्या चर्चा करतो, याचा विचार करून वर्तनात योग्य बदल करायला हवा. इतरांचे कौतुक करायला सुरुवात केली, तर इतरही आपले कौतुक करतील आणि कार्यालयातील वातावरण आनंददायी बनेल. उपजीविका आणि जीविका कार्यालयाच्या भल्यासाठी एकत्र आल्यास त्या कार्यालयाचा लौकिक निश्चित वाढेल. नोकरी पाट्या टाकण्याचे ठिकाण न मानता 'आनंदाचे धाम' बनेल.

## 'रिटर्न गिफ्ट' द्यायला हवी



आणखी एक महत्त्वाची गोष्ट नोकरी देत असते. ज्या कार्यालयात नोकरी करत असतो, त्या कार्यालयामुळे कर्मचाऱ्याला एक ओळख मिळते. या ओळखीमुळे त्याला समाजात एक स्थान मिळते. या ओळखीपोटी त्याने कार्यालयाला काही द्यावे, असे अपेक्षित नसते. मात्र, कर्मचाऱ्यांनी त्यासाठी कार्यालयाला काहीतरी 'रिटर्न गिफ्ट' द्यायला हवे. यासाठी कोणताही आर्थिक त्याग करण्याची गरज नाही. केवळ आपल्या कामामध्ये आनंद शोधायला सुरुवात करायला हवी. एखाद्याचे हस्ताक्षर सुंदर असेल तर त्याने आवश्यकता असेल, तेथे कार्यालयात आपले योगदान द्यायला हवे. निश्चितच त्याच्या हस्ताक्षराचे कौतुक त्याला सुखावून जाईल. मात्र, तेथे 'काम टाळू' वृत्ती ठेवली तर हे कौतुक त्याच्या वाट्याला येणार नाही.

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने १२९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेचे आजअखेर १२९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले.

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना १९ जूनपासून सुरुवात झाली आहे. शुक्रवारी बीएस्सी, बीए, एमबीए, एम.ए.बी.ई., बीए बीएड, बी. आर्किटेक्चर आदी १३ विषयांच्या परीक्षा झाल्या. १४ हजार २७ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठातर्फे शुक्रवारी ११ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. यात बॅचलर ऑफ डिझाईन, पीजी डिप्लोमा ह्युमन राईटस्, पीजी डिप्लोमा ऑनलाईन जर्नालिझम, डिप्लोमा इन टॅक्सेसन, बी. व्होक. (टूरिझम अँड सर्व्हिस इंडस्ट्री) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाई केली जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

परीक्षेअंतर्गत शुक्रवारी ४६ विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ४३ हजार ७९८



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

परीक्षा विभागाच्या वतीने महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांना १९ जुलैपासून सुरुवात झाली आहे. मंगळवारी (दि.२) बीए, बीएस्सी. (फूड अँड टेक्नॉलॉजी, बायो-टेक, आयटी, कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक), बीएस्सी (आयटी, इन्व्हायरमेंट सायन्स, कॉम्प्युटर सायन्स), एमबीए, बीई, बीएड, एमएस्सी, एलएलएम, बी. आर्किटेक्चर, बीसीए, एमसीए, बी. व्होक., बी. लिब., एम. लिब., बीजे., एमजे आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या.

सकाळ

# स्वातंत्र्यवीरांचे रोज स्मरण व्हावे : डॉ. व्ही. एन. शिंदे

कोल्हापूर, ता. १९ : "स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या शूरवीरांचे रोज स्मरण व्हावे. त्यांच्या त्यागावरच देश स्वतंत्र झाला. त्यामुळेच आपण आजादी का अमृतमहोत्सव साजरा करू शकत आहे," असे शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात आजादी का अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्य संग्रामवर आधारित चित्र, माहिती प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य डॉ. शानेदिवाण म्हणाले, "शहाजी महाविद्यालयने आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन केले."

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, सचिव विजयराव बोंद्रे, इतरांचे उपक्रमास प्रोत्साहन मिळाले. संस्थेचे प्रतिनिधी विठ्ठल आमले, इतर शाखांचे प्रमुख उपस्थित होते. शिवाजी ग्रंथालय, इतिहास विभाग प्रमुख, सांस्कृतिक विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, इतर विभागांनी उपक्रमांचे आयोजन केले.

डॉ विजय देठे, डॉ. के. एम. देसाई, डॉ. प्रशांत पाटील यांनी संयोजन केले. इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिखरे यांनी स्वागत केले. ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील यांनी आभार मानले.

तरुण भारत

# मानव्यशास्त्र अधिष्ठातापदी डॉ. देशमुख, क्रीडा संचालकपदी डॉ. बनसोडे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. एम. एस. देशमुख यांची आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालकपदी डॉ. शरद बनसोडे यांची निवड करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे पत्र दिले. विद्यापीठातील मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक पदासाठी गेल्या आठवड्यात मुलाखती झाल्या होत्या. गुरुवारी या निवड जाहीर करून कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी डॉ. देशमुख व डॉ. बनसोडे यांचे अभिनंदन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारती पाटील, डॉ. पी. डी. राऊत, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, संगणक विभागाचे प्रभारी संचालक अभिजीत रेडेकर, सहाय्यक कुलसचिव सुनीता यादव आदी उपस्थित होते.


एम. एस. देशमुख


डॉ. शरद बनसोडे

■ कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**संशोधक ते अधिष्ठाता डॉ. देशमुख**

डॉ. एम. एस. देशमुख सध्या विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक तसेच इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस कक्षाचे प्रभारी संचालक आहेत. अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळ, अधिसभा, विविध समित्यांवर त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमधून त्यांचे ५३ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी २१ पुस्तकांचे लेखन केले आहे. गेल्या २५ वर्षापासुन ते अध्यापन व संशोधनात कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत सहा विद्यार्थ्यांनी पीएच. डी. तर एकाने एम. फील. केले आहे. विद्यापीठ अर्थशास्त्र संघटनेचा डॉ. धनंजयराव गाडगीळ पुरस्कार, नवी दिल्ली येथील शैक्षणिक संघटनेकडून राधाकृष्ण सुवर्णपदक पुरस्कारासह अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

## आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल पंच डॉ. शरद बनसोडे

डॉ. शरद बनसोडे वीस वर्षांहून अधिक वर्षे देशभक्त रत्नाप्पा कुंभार महाविद्यालयात क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी बास्केटबॉलमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीयस्तरावर उत्तुंग कामगिरी केली आहे. शारीरिक शिक्षण विषयात ते सेट परीक्षा उत्तीर्ण असून पीएच. डी. पूर्ण केली आहे. आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल फेडरेशनचे गेली १५ वर्षे इंटरनॅशनल इलाईट रेफ्री आहेत, बास्केटबॉल, फुटबॉल आणि हँडबॉल या खेळांमध्ये दहा वर्षे त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. एकाच वर्षात या तिन्ही खेळांत सहभागी होण्याचा विक्रमही नोंदविला. सुमारे ७५ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत सहभाग नोंदविला. त्यामध्ये २७ आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा सहभाग आहे. देशातील विविध विद्यापीठे व शैक्षणिक संस्था यांच्यासाठी त्यांनी संघ निवड समिती सदस्य, प्रशिक्षक आणि व्यवस्थापक म्हणूनही काम केले आहे.